| | | |
|---|---|---|
| | महानगरपालिका अमरावती<br>सार्वजनिक आरोग्य विभाग<br>email ID - nuhmphdamc@rediffmail.com | |
| | **योग प्रशिक्षक करीता जाहिरात** | |

## कंत्राटी पदाकरीता थेट पदभरती (Walk in Interview)

राष्ट्रीय आरोग्य अभियान, अमरावती महानगरपालिका अमरावती अंतर्गत खालीलप्रमाणे कंत्राटी पदे भरावयाची आहे. करीता इच्छुक उमेदवारांनी दिलेल्या अर्ज नमुन्यानुसार आवश्यक शैक्षणीक कागदपत्रांसह खालील वेळापत्रकानुसार कार्यालयीन वेळेत दि. 6./05./2025 ते दि. .../..../2025 अर्ज सादर करावा. (प्रत्यक्ष घेऊन यावे व 1 xerox set घेऊन यावे) → आजचे.

<u>अर्ज सादर करण्याचा पत्ता</u> – राजकमल चौक, महानगरपालिका अमरावती, सार्वजनिक आरोग्य विभाग, पंजाब नॅशनल बॅंकेच्या वर, दुसरा माळा, आवक – जावक विभाग, येथे सुट्टीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेमध्ये सादर करावा.

### रिक्त पदाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| अ. क्रं | पदनाम | शैक्षणीक अर्हता | एकुण पदे | मानधन | रिक्त पदांचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | योग इंस्ट्रक्टर / योग प्रशिक्षक | 1)YCB Certified Yoga Professionals level 1 Yoga instructor / YCB Certified Yoga Professional level 2 Yoga Teacher / P.G.D. in Yoga Therapy -1 Year / Diploma in Yoga Education / B.A. / M.A. in Yoga / DNYS (Diploma in Naturopoathy & Yogic Science)<br>2) योगा बाबत अनुभवास प्राधान्य देण्यात येईल. | 3 | रू. 500/- मानधन आरोग्यवर्धीनी केंद्राच्या मार्गदर्शक सुचनेनुसार | महानगरपालिका कार्यक्षेत्रा अंतर्गत आरोग्यवर्धीनी मंदिर करीता |

सविस्तर जाहिरात अटी व शर्तीसह www.amravaticorporation.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. आवश्यक कागदपत्रे – खालील कागदपत्रांची मुळ प्रतीची छायांकित प्रत स्वासाक्षांकित करून अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

1) पदवी/पदविका प्रमाणपत्र, 2) गुणपत्रिका (सर्व), 3) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र, 4) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला, 5) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र, 6) पासपोर्ट आकाराचा फोटो, 7) रहिवासी दाखला (आधार कार्ड/इलेक्ट्रीक बिल)

| | | |
|---|---|---|
| अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक | :- | ...6......./05.../2025 |
| प्रात्याक्षिक परिक्षा दिनांक | :- | ...6......./05.../2025 |
| मुलाखत दिनांक | :- | ...6......./05.../2025 |
| प्रात्यक्षिक परिक्षा स्थळ | :- | मा.विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर सभागृह, महानगरपालिका अमरावती. |

अटी व शर्ती :-

1) योग इन्स्ट्रक्टर/योग प्रशिक्षक यांची निवड ही राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत, आरोग्यवर्धीनी संस्थेकरीता राहील, सदर निवड ही राज्य शासनाची नियमित अथवा कंत्राटी तत्वाची नसेल.

2) निवड झालेल्या उमेदवाराला निव्वळ रोजंदारीनुसार सत्राप्रमाणे मानधन देय राहील. सदर बाबतीत कुठल्याही कंत्राटी किंवा स्थायी पदावर हक्क सांगता येणार नाही.

3) योग इंस्ट्रक्टर / योग प्रशिक्षक यांनी एका दिवसात दोन पेक्षा जास्त योगासत्र आयोजित करण्यात येवू नये.

4) सदर रिक्त पदांचा संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवू शकतो. सदरची प्रक्रिया रद्द करणे, स्थगित करणे याबाबतचे अंतिम अधिकार निवड समिती व महानगरपालिकेने राखुन ठेवलेले ठेवलेले आहे. याबाबत कोणताही प्रकारचा दावा करता येणार नाही.

5) योग इंस्ट्रक्टर / योग प्रशिक्षक पदाकरीता फक्त अमरावती शहरी भागातील स्थानिक रहिवासी यांनी आवेदन करावे. इतर जिल्हयातील उमेदवारांनी आवेदन सादर करू नये, त्यांचे आवेदन अपात्र करण्यात येईल.

6) अनुभवी तसेच उच्च् शैक्षणीक अर्हता धारकास प्राधान्य देण्यात येईल.

7) योग इंस्ट्रक्टर / योग प्रशिक्षक या पदाकरीता सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा.

8) उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही प्रात्यक्षिक प्रक्रियेव्दारे घेण्यात येत असल्याने जाहिरातीमध्ये नमुद दिनांकानुसार विहीत कालावधीतील अर्ज, आवश्यक शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयास सादर करावा.

9) मुलाखती करीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

10) सदर पदांकरीता जाहिरातीमध्ये नमुद शैक्षणीक अर्हता नसल्यास उमेदवारास प्रात्यक्षिक परिक्षेच्या वेळी अपात्र करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी
महानगरपालिका अमरावती

अति.आयुक्त-2
महानगरपालिका अमरावती

आयुक्त
महानगरपालिका अमरावती